# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स-२२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk4a@dte.org.in Internet :http/www.dte.org

कार्यालयीन आदेश

क्रमांक : ४अ/आस्था/२००८/७६०

दिनांक : 24 OCT 2008

पहा : १. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक कंत्राटी २००७/(७७/०७)/ तांशि-२, दिनांक ०५.०५.२००७.

उपरोक्त शासन निर्णयान्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे राज्यातील शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्थांतील रिक्त असलेल्या अधिव्याख्यात्यांच्या पदावर खाली नमुद केलेल्या उमेदवाराची रु.१२०००/- (रुपये बारा हजार फक्त) या मासिक ठोक वेतनावर त्यांच्या नावासमोरील दर्शविलेल्या पदावर या आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्ष किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत अथवा नियमित स्वरुपात नियुक्तीने उमेदवार उपलब्ध होणे यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत निव्वळ कंत्राटी तत्वावर नियुक्ती करीत आहेत.

| अक्र | उमेदवारांचे नाव व पत्ता | नियुक्ती प्रवर्ग | कंत्राटी तत्वावर नियुक्तीचे पद व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती गिरी कविता गौतम (५८००५५४२)<br>द्वारा एल जी गिरी, २२३, सहयोग कॉलनी, प्रगती नगर, रिंग रोड, लातूर ४१३५१२ | भज ब | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, **लातूर** रिक्त असलेल्या **अधिव्याख्याता अणुविद्युत** या पदावर |
| २. | श्रीमती पठाण जरीना जब्बारखान (५८००३१७३)<br>द्वारा पठाण जे एम, न्यू भाग्य नगर, एम आय डी सी च्या जवळ, लातूर ४१३५३१ | खुला | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, **लातूर** येथे रिक्त असलेल्या **अधिव्याख्याता अणुविद्युत** या पदावर |
| ३. | श्रीमती दिघुले प्रेरणा भिमराव (५८००५६२२)<br>प्लॉट नं १६१, रायजी ऑटो जवळ, नविन कावसान, पैठण, औरंगाबाद ४३१००७ | भज ड | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, **लातूर** येथे रिक्त असलेल्या **अधिव्याख्याता अणुविद्युत** या पदावर |
| ४. | श्रीमती चिंचोलकर शितल हरीश्चंद्र (५८००५८५७)<br>द्वारा चिंचोलकर एच व्हि, जुनी काझी गल्ली, मिस्कीनपुरा चौक, लातूर ४१३५१२ | खुला | शासकीय तंत्रनिकेतन, **नांदेड** येथे रिक्त असलेल्या **अधिव्याख्याता अणुविद्युत** या पदावर |
| ५. | श्रीमती माथुरकर प्रतिक्षा गोपाळराव (५८००५४७५)<br>द्वारा विजय एस दवे, शांतिनगर, कुलकर्णी ड्राइव्हिंग स्कूल जवळ, जुना बायपास रोड, अमरावती ४४४६०६ | इमाव | शासकीय तंत्रनिकेतन, **यवतमाळ** येथे रिक्त असलेल्या **अधिव्याख्याता अणुविद्युत** या पदावर |
| ६. | श्रीमती झोळ मनिषा फत्तेसिंग (५८००५५०८)<br>चंदे कोचिंग क्लासेस, आर ए कॉलेज रोड, वाशिम | खुला | शासकीय तंत्रनिकेतन, **वाशिम** येथे रिक्त असलेल्या **अधिव्याख्याता अणुविद्युत** या पदावर |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | श्री मोरे प्रविण विठ्ठलराव (५८००५९०४) घर नं ३-६, सीटीएस ४७९, सत्कार्या नगर, जुना जालना, ता जालना ४३१ २१३ | अजा | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, **यवतमाळ** येथे रिक्त असलेल्या **अधिव्याख्याता अणुविद्युत** या पदावर |
| ८. | श्रीमती तिरपुडे प्रिती लक्ष्मण (५८००५९०१) द्वारा अशोक एस मेश्राम, प्लॉट नं ६४, नागसेन सोसायटी, मानकापुर, नागपूर ४४० ०३०. | अजा | शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर येथे रिक्त असलेल्या **अधिव्याख्याता** अणुविद्युत या पदावर |

वरील उमेदवारांच्या कंत्राटी तत्वावरील नियुक्त्या पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येत आहेत.

१. **त्यांची नियुक्ती या आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्ष किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत अथवा नियमित स्वरुपात नियुक्तीने उमेदवार उपलब्ध होणे यापैकी जे अगोदर घडेल तेवढया कालावधीसाठी असतील, त्यानंतर या कंत्राटी नियुक्त्या आपोआप संपुष्टात येतील.**

२. त्यांची नियुक्ती रुपये १२०००/-(रुपये बारा हजार फक्त) या एकत्रित मासिक वेतनावर करण्यात येत असून त्यांना कोणत्याही प्रकारचे इतर भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

३. त्यांनी संबंधित शासकीय तंत्रनिकेतनात उपलब्ध असलेल्या करार पत्राच्या नमुन्यात रुपये १००/-च्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र नियुक्त पदावर हजर होतेवेळी देणे बंधनकारक आहे, अन्यथा सदरचे आदेश रद्द ठरतील.

४. त्यांची सेवा बदलीपात्र राहणार नाहीत, मात्र प्रशासकीय कारणास्तव व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी गरज उद्‌भवल्यास त्यांची इतर शासकीय तंत्रनिकेतनात बदली करण्यात येईल.

५. त्यांची नियुक्ती त्यांचे शैक्षणिक / अद्यापनाचे काम समाधानकारक असल्यावर अवलंबून राहील व कोणत्याही पुर्वसुचनेशिवाय संपुष्टात आणण्यात येतील व याबाबतीत संबंधित विभाग प्रमुख व प्राचार्य यांची शिफारस अंतिम राहील.

६. त्यांचे विरुध्द विद्यार्थ्यांची तक्रार असल्यास सदर तक्रारीबाबत संबंधित विभाग प्रमुख / प्राचार्यांच्या शिफारशीनुसार त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

७. **त्यांनी या आदेशाच्या दिनांकापासून ८ दिवसांच्या आत रुजू व्हावे, जे उमेदवार दिलेल्या मुदतीत रुजू होणार नाहीत त्यांच्या नियुक्तीचा आदेश आपोआप संपुष्टात येईल त्याबाबत पुनर्विचार करण्यांत येणार नाही याची नोंद घ्यावी.**

८. त्यांची नियुक्ती करारपत्रात नमुद केलेल्या कालावधीनंतर आपोआप संपुष्टात येईल.

९. प्रस्तुत नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी पध्दतीने असल्यामुळे संबंधितांना नियमित नियुक्ती धारकांचे लाभ मिळणार नाहीत.

१०. त्यांना अद्यापनाशिवाय वरीष्ठांनी सोपविलेली तद्‌अनुषंगीक इतर प्रशासकीय कामे कारणे बंधनकारक राहील.

११. संबंधितांची नियुक्ती जर विशिष्ट मागासवर्गीय प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे त्या पदावर केलेली असेलतर त्यांची सेवा भविष्यात सदर विशिष्ट मागासवर्गीय प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाल्यास समाप्त करण्यात येईल.

१२. **त्यांनी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेसंबंधी, जात व जात वैधता प्रमाणपत्र ( लागू असल्यास ) व उन्नत / उच्च उत्पन्न गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉनक्रिमीलेअर सर्टिफिकेट) (लागू असल्यास) या प्रमाणपत्राचा छायांकित १ संच मुळ प्रमाणपत्रासह नियुक्तीच्या पदावर हजर होतेवेळी प्राचार्यांना सादर करावा. त्यांनी ऑन लाईन पध्दतीने अर्ज करताना दिलेली माहिती व प्रत्यक्ष प्रमाणपत्रांची**

**माहिती यामध्ये तफावत आढळल्यास संबंधितांचे नियुक्ती आदेश आपोआप संपुष्टात येतील, याची नोंद घेण्यात यावी.**

१३. संबंधितांवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा नसल्याचे किंवा कोणत्याही प्रकारचे आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे संबंधितांनी सादर करणे अनिवार्य आहे.

१४. ज्या प्रकरणी वरील कार्यपध्दतीचे पालन करण्यात येणार नाही, त्याप्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यांत येईल.

( डॉ सुका महाजन )
प्र संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत : माहिती व आवश्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१. कोषागार अधिकारी, नांदेड / लातूर / यवतमाळ / नागपूर / वाशिम
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
३. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड / यवतमाळ / नागपूर / वाशिम.
४. प्राचार्य, निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर / यवतमाळ
५. संबंधित व्यक्ती
६. श्री एन बी पाटील, प्रणाली विश्लेषक, मुख्य कार्यालय, मुंबई.
७. कार्यासन क्रमांक ४अ, निवड नस्ती.